## छात्रसंघाचे गठण

महाराष्ट्र कायदा २०१६ व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचे निर्देशाप्रमाणे छात्रसंघाचे गठन केल्या जाईल.

## ओळखपत्र

विद्यार्थ्यांजवळ नेहमी ओळखपत्र असणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील कोणत्याही शिक्षकांनी किंवा अन्य कर्मचाऱ्यांने ओळखपत्राची मागणी केल्यास विद्यार्थ्यांनी ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना वर्गात बसता येणार नाही. ओळखपत्र हरविल्यावर त्याच्या दुय्यमप्रतीसाठी रु. ३० शुल्क भरावे लागेल.

## मुलींकरिता खास वस्तीगृहाची व्यवस्था

सत्र २०१५-१६ पासून महाविद्यालयात यु.जी.सी. अंतर्गत मुलींच्या वस्तीगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ताबडतोब प्रवेश निश्चित करावा.(फक्त ५० विद्यार्थीनीकरिता)

## ड्रेस कोड

कनिष्ठ, एच.एस.सी. व्होकेशनल / व वरीष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी / विद्यार्थीनीकरिता सत्र २०१०-११ पासून गणवेष निर्धारीत करण्यात आले आहे. गणवेषा शिवाय विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्रांगणात / वर्गात प्रवेश मिळणार नाही. याची विद्यार्थ्यांनी/ पालकांनी नोंद घ्यावी.

## विद्यार्थ्यांसाठी एस. टी. बस भाडे सवलत योजना

महाविद्यालयात प्रवेशित शहराबाहेरील विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाच्यावतीने राज्य परिवहन महामंडळाच्या तर्फे बस भाडे सवलत प्रदान केल्या जाते. मुलांसाठी २५ वर्षे वयोमर्यादा असून मुलींसाठी वयाची अट नाही. बस भाडे सवलतीचा उपयोग विद्यार्थ्यांनी स्वत:साठी करावा. कोणत्याही अन्य अनधिकृत व्यक्तीस ''पास''हस्तांतरण करु नये तसेच पास वर अनधिकृतरित्या खाडाखोड करू नये. असे करणे गुन्हा ठरतो आणि राज्य परिवहन महामंडळ विद्यार्थ्यांवर फौजदारी प्रकरण दाखल करू शकते. बस वाहकाने किंवा कोणत्याही संबंधित अधिकाऱ्याने ''पास'' तपासणीसाठी मागीतल्यास ती सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

# महाविद्यालयातील उपस्थिती

महाविद्यालयातील वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक तासिकांना उपस्थित राहणे विद्यार्थ्यांना बंधनकारक असून प्रत्येक महिन्यातील आणि एकूण सत्रातील उपस्थिती ७५ टक्क्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्यांना शुल्क सवलती/ शिष्यवृत्ती मिळणार नाही. शिवाय परिक्षेला सुध्दा बसता येणार नाही.

# महाविद्यालयीन परीक्षा

वर्ग ११ कला, वाणिज्य, विज्ञान आणि किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेचे निकाल २ घटक चाचण्या स्वाध्याय व तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक आणि दोन सत्र परीक्षांच्या सरासरी गुणांवर अवलंबून असते. या परिक्षेमध्ये सरासरी ३५ टक्क्यापेक्षा कमी गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास अनुत्तीर्ण म्हणून जाहीर करण्यात येईल. वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण प्रकल्प सादर केल्याशिवाय वार्षिक परिक्षेचा फॉर्म भरता येणार नाही. व वर्ग १२ च्या विद्यार्थ्यांना सुध्दा २ घटक चांचण्या स्वाध्याय व तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षां वार्षिक परिक्षेसाठी तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे. त्या शिवाय वार्षिक परिक्षा उत्तीर्ण होणार नाही आणि दोन सत्र परीक्षा देणे आवश्यक आहे.

विद्यापीठ वार्षिक परिक्षेशिवाय वरीष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या चाचणी परीक्षा तसेच सराव परीक्षा घेण्यात येतात या सर्व परीक्षाना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन परिक्षेत प्रती विषयात २० टक्के पेक्षा कमी गुण मिळाले तर प्रत्येक विषयाला ५ रु. दंड आकारण्यात येईल. अनुपस्थित राहणाऱ्यांना प्रति विषयास २५ रु. दंड आकारण्यात येईल.